(      )                नि.दि.दावा क्र. ७८/२०१०
नि.६२,६३ व ६४ वरील...आदेश

रमेश तावसे वि. जगन्नाथ तावसे आणि इतर

**नि.दि.दावा क्र.७८/२०१० मधील नि.६२,६३ व ६४ वरील एकत्रीत आदेश**

१. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटणी व मनाईकरीता दाखल केलेला आहे. निशाणी ६३ वरील अर्ज हे मयत वादी क्र.४ रामा नारायण तावसे याचे वारसांना अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेकरीता दाखल केलेले आहेत. निशाणी ६२ वरील अर्ज हा वादी क्र.४ याचे वारसांची नोंद करणेस व अबेटमेंटचा आदेश रद्द ठरविणेकरीता (set aside) दाखल केलेला आहे. निशाणी ६४ वरील अर्ज हा वादी क्र.४ हा दिनांक १२/०६/२०१८ रोजी मयत झाले व त्याचे वारस अभिलेखावर आणणेकरीता दुरुस्तीकरीता अर्ज दाखल केला. प्रतिवादीतर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविण्यात आला.

२. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांच्या अर्जात व म्हणण्यात नमूद मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला. वर नमूद संपूर्ण बाबींचा व संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, वादी क्र.४ हा दिनांक १२/०६/२०१८ रोजी मयत झाला आहे ही बाब न्यायालयाला इतर वादींनी अगर वकिलानी कळविले नाही. वादीने प्रस्तुतचे अर्ज हे शपथेवर दाखल केलेले आहेत. त्याने शपथेवर कथन केले की, त्याने वादी क्र.४ याचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे असल्याचे ते अज्ञानी व अशिक्षित असल्याने ते वकिलांना महिती देवू शकले नाही.

३.       सबब वरील सर्व बाबींचा विचार करता मी या निष्कर्षास आलो आहे की, वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब हा माफ करणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने जरुरीचे आहे तसेच वादी क्र.४ याचा हक्क उत्तरजीवी (survive) होत असल्याने झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करणे जरुरीचे आहे. प्रस्तुतचा दावा हा तुर्तातूत मनाईचे अर्जाचे चौकशीकामी प्रलंबित आहे. वादी क्र.४ हा दिनांक १२/०६/२०१८ रोजी मयत झाला. भारतीय मुदत कायदा आर्टीकल १२० प्रमाणे मृत्यू तारखेपासून ९० दिवसांमध्ये मयताचे वारसांना संचिकेवर आणणे गरजेचे आहे तसेच आर्टीकल १२१ प्रमाणे अवसान पावल्याचे तारखेपासून ६० दिवसांत अवसान पावलेचे हुकूम रद्द होणेसाठी अर्ज देणे गरजेचे आहे. परंतु, वादीचे वकीलाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम १०अ प्रमाणे कर्तव्यायाचे पालन केले नाही. वादी क्र.४ मयत झालेबाबत मुदतीत कळविले नाही.

४.       वर नमूद बाबींचा व संपूर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे दिसून आले की, वादीने नि.६२ ते ६४ वरील अर्जातील मजकूर हा शपथपत्रावर कथन केलेला आहे. प्रस्तुतचे अर्ज मंजूर केल्यास दाव्याच्या अंतिम निकालावर निर्माण होणा–या उभयपक्षकारांतील वादप्रश्नांचे निरसन होण्यास मदत होईल. तसेच प्रस्तुत दाव्याचे हुकूमनाम्याची परिणामकारक बजावणी होण्याकरीता मयत वादी क्र.४ याचे वारसांना अभिलेखावर सामील करणे आवश्यक आहे. निशाणी ६४ चे अवलोकन केले

असता असे दिसून आले की, मयत वादी क्र.४ याचे वारस हे वादी क्र.१ ते ३ व प्रतिवादी क्र.११ हे आहे व ते अभिलेखावर आहे. सदर बाब पाहता वादींना त्वरीत प्रस्तुतची दुरुस्ती अर्ज देता आले असते, परंतु सुमारे पाच महिन्यांचा विलंब करण्यात आला आहे.

५. वादी क्र.४ याचे हक्क हे उत्तरजीवी (survive) होत असल्याने त्याचे वारस अभिलेखावर येणे हे न्यायाच्या हिताच्या दृष्टीने गरजेचे झालेले असून झालेला विलंब हा माफ करणे व अवसान पावलेचा आदेश रद्द करणे मला न्यायोचित वाटते. तसेच वादीनी सुमारे पाच महिने मयत वादी क्रमांक ४ याचे वारसांची माहिती देण्यास विलंब लावला . त्यामुळे दाव्याचे कामकाजास विलंब झाला. दावा हा सुमारे पाच वर्षापासून तुर्तातूर्त मनाई अर्जाचे चौकशीसाठी प्रलंबित आहे. वादीने दाव्याचे कामकाज लवकरात लवकर होण्यासाठी तत्परता दाखविली नाही. यामुळे त्याचेवर खर्चाची रक्कम लादणे मला न्यायोचित वाटते. सबब वरील सर्व बाबींचा विचार केला असता मला खालील आदेश पारीत करणे न्यायोचित वाटते.

## आदेश

१. वादीचे निशाणी ६२,६३ व ६४ वरील अर्ज हे खर्च र.रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) वर मंजूर करण्यात येतात.

२. वादीने खर्चापोटी र.रु.२००/- (रुपये दोनशे फक्त) ही सरकार जमा करावी.

<u>नि.दि.दावा क्र. ७८/२०१०</u>
<u>नि.६२,६३ व ६४ वरील...आदेश</u>

३. वादीने निशाणी ६२,६३ व ६४ प्रमाणे वादी क्र.४ याचे वारसांबाबतचे प्रस्तावित दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसांचे आत अभिलेखावर आणावे व दाव्याची दुरुस्ती प्रत द्यावी.

४. संबंधित लिपिकाने या दुरुस्तीची नोंद या दाव्याचे रजिस्टरला करावी.

( न्यायासनावरुन खुल्या न्यायालयात घोषित केले. )

म्हसवड
दिनांक १८/०१/२०१९

(**गजेंद्र म. कोल्हापुरे**)
दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, म्हसवड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. File order are same word to word, as per the original order.

Name of the Stenographer : D. C. Raut, Steno (L.G.)

Court Name : C.J.J.D. ,Mhaswad, Tal.Man, Dist. Satara

Order Date : 18/01/2019

Order signed by the Presiding Officer on :18/01/2019

Order uploaded on : 18/01/2019